नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९७ Issue - 97 | वार रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ Blow- Sunday Date 24 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

लाडक्या बहिणींची कोणतीही योजना बंद होणार नाही

राज्यात एक कोटी लखपती दीदी करणार; सीएम देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील महिलांना सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असून येत्या काळात एक कोटी बहिणींना लखपती दीदी बनविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. विरोधक कितीही टीका करोत, पण महिलांसाठी सुरु केलेली कोणतीही योजना पुढील पाच वर्षे बंद होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

भारतीय जनता पार्टीच्या 'माझा भाऊ देवाभाऊ' अभियानांतर्गत राज्यभरातील महिलांनी पाठविलेल्या हजारो राख्यांचा सोहळा शनिवारी पार पडला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बहिणींनी दिलेल्या प्रेमाचा स्वीकार करून त्यांना आभार मानले. या कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, आमदार चित्रा वाघ, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार विद्या ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, बहिणींच्या आशीर्वादाने २०२९ मध्येही महाराष्ट्रात आमचेच सरकार सत्तेत येईल. महायुती सरकार महिलांच्या सहकारी संस्थांना हक्काचे स्थान देण्यासाठी कटिबद्ध आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विरोधक म्हणतात की लाडक्या बहिणींसाठीची योजना बंद होणार. पण मी आश्वासन देतो की, २०२९ पर्यंत लाडक्या बहिणींसाठी असणारी कोणतीही योजना बंद होणार नाही. त्यानंतर आमचे सरकार आले तर या सर्व योजना पुढेही सुरू ठेऊ.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या राख्या धर्म, जात, पंथाच्या पलीकडच्या आहेत. इतक्या बहीणींचे प्रेम ज्याच्याकडे आहे, अशा भावाला कुणाचीही भीती नसते. माझ्या लाडक्या बहिणींच्या मताला 'व्होट चोरी' म्हणणारेच खरे चोर आहेत. अशा निर्बुद्धांना अक्कल यावी म्हणून माझ्या बहिणींनी त्यांना २५ टक्के आशीर्वाद द्यावेत. देशातील मातृशक्ती ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे आणि महिलांच्या मान-सन्मानासाठी महायुती सरकार नेहमी कार्यरत राहील अशी ग्वाही देवेंद्र फडणवीसांनी दिली.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी राज्यभरातून तब्बल ३६ लाख ७८ हजार राख्या आल्या आहेत. देवाभाऊंनी केलेले अविरत कार्य प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे हीच बहिणींची खरी भेट आहे असेही त्यांनी म्हटले.

आमदार चित्रा वाघ म्हणाल्या, देवाभाऊंनी महिलांना काम व दाम मिळावे यासाठी महिला सहकारी संस्थांची उभारणी केली. बहिणींच्या भल्यासाठी झटणारा असा भाऊ लाभणे म्हणजे भाग्य आहे.

शेतकऱ्यांनी आता नुकसानीची सवय लावून घ्यावी

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचा अजब सल्ला

मुंबई : वर्षातले ३६५ दिवसांपैकी ३३२ दिवस शेतकऱ्यांना संकटाला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता नुकसानीची सवय लावून घ्यावी असा अजब सल्ला केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिला आहे. ते एवढ्यावर थांबले नाहीत तर अतिवृष्टी व आपत्तीमुळे शेतकऱ्याचे होणारे नुकसान आता सरकार भरून देऊ शकत नाही असं म्हणत त्यांनी मदतीबाबत झटकले.

सध्या राज्यात अतिवृष्टीने थैमान घातल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालं आहे अशा परिस्थितीत शेतकरी सरकारकडून मदतीची आस लावून बसला आहे या पार्श्वभूमीवर कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केलेल्या अजब वक्तव्यामुळे नवीन वादाला फोडणी मिळाली आहे.

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी शेतकऱ्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याचा राष्ट्रीय सम ाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी चांगलाच सम ाचार घेतला. पाशा पटेल यांचे वक्तव्य दुर्दैवी असल्याचं जानकर म्हणाले. ते अकोला जिल्ह्यातील सांगवामेळ येथे माध्यमांशी बोलत होते. शेतकऱ्यांनी आता नुकसानीची सवय लावून घ्यावी असा अजब सल्ला राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी शेतकऱ्यांना दिला. सरकार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊ शकत नाही असंही पाशा पटेल म्हणाले. त्यावर माजी मंत्री महादेव जानकर यांनी प्रतिक्रिया दिली. सध्या शेतकरी वाईट परिस्थितीतून जात असताना पाशा पटेल यांच्यासारखे नेते असे बेजबाबदार वक्तव्य कसे करू शकतात असा प्रश्न महादेव जानकर यांनी विचारला. प्रजा ज्यावेळी अडचणीत असते त्यावेळी राजाने त्यांना मदत करणे अपेक्षित असते. सरकारी पदावर असलेल्या माणसाने असं वक्तव्य करणे योग्य नाही असं महादेव जानकर म्हणाले. अकोला जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या मूर्तिजापूर तालुक्यातील विविध गावांना राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर भेट दिली. तालुक्यातील सांगवामेळ, भटोरी, पारध, कौलखेड जहांगीर या गावांना त्यांनी भेटी दिल्यात. यावेळी जानकरांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत यावेळी त्यांनी फोनवरून जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर आणि जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची विनंती केली.

घटनादुरूस्ती विधेयक जेपीसीकडे, पण समितीत सामील होण्यावरुन मतभिन्नता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : किमान ५ वर्षांच्या शिक्षेच्या तरतुदी असलेल्या गुन्ह्यांमध्ये तुरुंगवास भोगलेल्या मुख्यमंत्री, मंत्री व पंतप्रधानांना पदावरून हटवण्याची तरतूद असलेल्या विधेयकावरून इंडिया आघाडीत मतभेद आहेत. तृणमूल काँग्रेसने जेपीसीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. तर काँग्रेस आणि इतर पक्ष मात्र या िपंतप्रधानांनाही पदावरून आपोआप हटवण्यासाठी चौकट तयार करणारे तीन विधेयक मांडण्यात आले. ते विधेयक वादग्रस्त ठरत आहेत. यावर विचार करण्यासाठी केंद्राने स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीमध्ये (जेपीसी) सहभागी होण्यावरून विरोधकांच्या इंडिया आघाडीतील मतभिन्नतेची दरी रुंदावत चालली आहे.

जेपीसी म्हणजे निव्वळ 'तमाशा' असल्याने आपल्या पक्षाच्या कोणत्याही सदस्यांना त्यात पाठवणार नाही, असे तृणमूल काँग्रेसने शनिवारी स्पष्ट केले. मात्र काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य पक्षांचे मत यापेक्षा वेगळे आहे. राज्यघटना (१३० वी दुरूस्ती) विधेयक २०२५, केंद्रशासित प्रदेश सरकार (दुरुस्ती) विधेयक २०२५ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक २०२५ सरकारने बुधवारी प्रचंड गदारोळात लोकसभेत सादर केले. तर लगेच जेपीसीकडे पाठविण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

मनसेची मते चोरली, तपास झाला तर यांचा १०-१२ वर्षांचा खेळ उघडा पडेल; मतचोरीच्या वादात राज ठाकरेंची उडी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आपल्याला मतं मिळतात, पण मतपेटीतून ती चोरली जातात. राहुल गांधींनी केलेल्या आरोपांची जर चौकशी झाली तर गेल्या १०-१२ वर्षातील यांचा खेळ समोर येईल असं म्हणत राज ठाकरेंनी मतचोरीच्या वादात उडी घेतली आहे. एकाच वेळी राहुल गांधी आणि भाजपचे अनुराग ठाकुर मतांच्या गोंधळाचा आरोप करत आहेत. पण निवडणूक आयोग हे प्रकरण दाबून ठेवत असल्याचा आरोप राज ठाकरेंनी केला.

राज ठाकरेंनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांना कानमंत्र दिला. निवडणूक जिंकायची असेल तर मतदारयादीतील घोळ उघडा पाडा असं राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे यांनी राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपांना एक प्रकारे दुजोरा दिला. राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली तर यांचा खेळ उघडा पडेल असं म्हणत त्यांनी निवडणूक आयोगासह भाजपवर टीका केली. मतदानामध्ये काहीतरी गडबड आहे असं मी नेहमी म्हणतो. यासाठी मी शरद पवार, सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांना भेटलो. महाराष्ट्रात सगळे माझ्यासोबत आले आणि आमची पत्रकार परिषदही झाली. पण आयत्या वेळी यांनी कच खाल्ली. मी त्याचवेळी सांगत होतो की, लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाका, त्याची जागतिक बातमी होईल. आता राहुल गांधी यांनी हे प्रकरण बाहेर काढलं.

सोलापूर जिल्ह्यात ९० टक्के बोगस आश्रमशाळा

विधानमंडळ समितीच्या पाहणीत धक्कादायक वास्तव उघड

नागनळी आश्रम शाळेची ही समितीकडे तक्रारी, अनेक बोगस कामाचे केले चौकशीची मागणी; अधिकारी आणि आश्रम शाळा चालकांमध्ये भ्रष्टाचाराची मिलीभगत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/महेश गायकवाड :

सोलापूर : विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या नावाखाली सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेला कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा महाराष्ट्र विधानमंडळाच्या समितीने उघडकीस आणला आहे. जिल्ह्यातील तब्बल ९७ पैकी ९० टक्के आश्रमशाळा केवळ कागदोपत्री असून, त्या पूर्णपणे बोगस पद्धतीने चालवल्या जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विद्यार्थ्यांच्या नावे शासनाकडून मिळणारे कोट्यवधी रुपयांचे अनुदान संस्थाचालक आणि काही भ्रष्ट अधिकारी संगनमताने हडप करत असल्याचा खळबळजनक आरोप समितीचे अध्यक्ष आमदार सुहास कांदे यांनी केला आहे. या सर्व बोगस शाळांवर प्रशासक नेमण्यासोबतच, दोषी अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचा कठोर इशाराही त्यांनी दिला आहे.

- **अनुदानातील केवळ १० ते २० टक्के रक्कमच विद्यार्थ्यांवर खर्च**
- **दोषी अधिकारी-संस्थाचालकांवर बडतर्फीची कारवाई होणार**
- **सर्व अधिकाऱ्यांची मंत्रालयात उच्चस्तरीय होणार चौकशी**
- **सोलापूर जिल्ह्यातील आश्रम शाळांमध्ये सस्थाचालक आणि अधिकारी यांच्या मिलीभगत मुळे भ्रष्ट कारभार**

महाराष्ट्र विधानमंडळाची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती १९ ते २१ ऑगस्ट दरम्यान सोलापूर जिल्ह्याच्या दौर्यावर होती. या दौर्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी जिल्हा नियोजन समिती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत अध्यक्ष आमदार सुहास कांदे यांनी हा गौप्यस्फोट केला. यावेळी समिती सदस्य आमदार प्रवीण स्वामी, आमदार अमोल मिटकरी, आमदार देवेंद्र कोठे, अनिल मांगुलकर, उमेश यावलकर आदी उपस्थित होते.

आमदार कांदे यांनी सांगितले की, भटक्या विमुक्त जमातींच्या कल्याणासाठी शासन विविध योजना राबवते आणि त्यासाठी कोट्यवधींचा निधी देते. हा निधी आणि योजना खर्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतात की नाही, याची पाहणी करण्यासाठी समितीने जिल्ह्यातील अनेक आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. या पाहणीत समितीला जो अनुभव आला, तो अत्यंत विदारक आणि संतापजनक होता.

समितीच्या तपासणीत अनेक गंभीर आणि अनियमित बाबी आढळून आल्या. अनेक शाळांमधील शिक्षणाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसल्याचे स्पष्ट झाले. विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारे बूट, गणवेश आणि पौष्टिक आहार दिला जात नव्हता. अनेक ठिकाणी तर मुला-मुलींसाठी बाथरूम, टॉयलेट आणि अंघोळीसाठी गरम पाण्याची सोयही नव्हती. बहुतांश वर्गखोल्यांमध्ये पंखे किंवा दिव्यांची सोय नव्हती, ज्यामुळे विद्यार्थी अंधारात आणि उकाड्यात बसण्यास मजबूर होते. धक्कादायक म्हणजे, अनेक विद्यार्थ्यांकडे साधे ओळखपत्रही नव्हते.

घराणेशाहीचा कळस:

अनेक शाळांमध्ये संस्थाचालक स्वतःच मुख्याध्यापक आहेत, तर शिक्षक आणि इतर कर्मचारीही त्यांच्याच घरातील नातेवाईक असल्याचे उघड झाले. मारुती गणपती पवार नामक संस्थाचालकांच्या शाळेत सर्वाधिक अनियमितता आढळल्याचेही समितीने स्पष्ट केले.

...तर आश्रमशाळांवर प्रशासक नेमणार!

या बोगस कारभारावर तीव्र संताप व्यक्त करत आमदार कांदे म्हणाले, ज्या आश्रमशाळांमध्ये अनियमितता आढळली आहे, त्यांना सर्व सोयीसुविधा पुरवण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत सुधारणा न झाल्यास, या सर्व शाळांचे व्यवस्थापन काढून घेऊन त्यांच्यावर प्रशासक नेमण्यात येईल.

नागनळी आश्रम शाळेची ही समितीकडे तक्रारी

अक्कलकोट पासून जवळच असलेल्या नागनहाळी येथील आश्रम शाळे मध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरू असून अनेक कर्मचाऱ्यांकडून भरती करून घेताना जवळपास १५ ते २० लाख रुपयांपर्यंत रक्कम घेऊन नोकरी देण्यात आल्याचे कळते महिला कर्मचारी आश्रम शाळांमध्ये राहत नाहीत त्या त्यांच्या मूळ गावी निघून जातात अनेक महिला कर्मचारी आपल्या जागी बदली महिला नेमून घरी बसून पगार घेत असल्याचीही माहिती कळते या व अशा अनेक गोष्टी या आश्रम शाळेत सुरू असून अनागोंदी कारभार बाहेर पडू नये म्हणून काही चिटूर फिटूर वार्ताहर लोकांना हाताशी धरून त्यांचा सत्कार करून आश्रम शाळेतील बारा भानगडी लपविल्या जात असल्याचे कळते.

८० ते ९० टक्के रक्कम आपल्या खिशात..

शासन प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दरमहा २,२०० रुपये अनुदान देते. मात्र, यातील केवळ १० ते २० टक्के रक्कमच विद्यार्थ्यांवर खर्च केली जात होती. उर्वरित ८० ते ९० टक्के रक्कम संस्थाचालक थेट आपल्या खिशात घालत असल्याचे समितीच्या तपासणीत निदर्शनास आले आहे.

अधिकारीही 'रडार'वर

कोणतीही प्रत्यक्ष पाहणी किंवा चौकशी न करता या शाळांना अनुदान देणारे अधिकारीही या घोटाळ्यात तितकेच सामील आहेत. या सर्व अधिकार्यांची मंत्रालयात उच्चस्तरीय चौकशी केली जाईल. दोषी आढळणार्यांना थेट बडतर्फ केले जाईल, असा खणखणीत इशाराही कांदे यांनी दिला.

सहा महिन्यांनी पुन्हा तपासणी; राजकीय दबाव झुगारणार

समिती सहा महिन्यांनंतर पुन्हा सोलापूर जिल्ह्याचा दौरा करून आश्रमशाळांची तपासणी करणार आहे. तसेच, तांडा वस्ती सुधार योजनेचा निधीही योग्यप्रकारे वापरला गेला नसल्याचे समितीने म्हटले आहे. यातील अनेक आश्रमशाळा राजकीय नेत्यांच्या आहेत; मात्र नेता कोणत्याही पक्षाचा असो वा कितीही मोठा असो, त्याच्यावर कारवाई होणारच, असे आमदार सुहास कांदे यांनी ठामपणे सांगितले.

इंदापूर तालुक्याचे आमदार व कृषी मंत्री दत्तात्रय भरणे व खासदार सुप्रिया सुळे पारधी समाजांच्या भेटीसाठी जाणार का?

पारधी समाजाच्या महिला व लहान मुलांवरती अमानुष पणे लाठी चार्ज करणाऱ्या पोलिसांवरती गुन्हे दाखल होणार का ? जनतेत चर्चा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

तालुक्यातील बाभुळगाव येथे उभारण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पासाठी जमिनीचा ताबा घेत असताना. अतिक्रमण हटवण्यासाठी गेलेल्या प्रशासना-तील अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्थानिक लोकांनी विरोध केला.

या भागात अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली त्या भागात अनेक धनदांडग्यांची अतिक्रमणे असून अतिक्रमण केलेली शेती ओलिताखाली आहे.

मात्र संबंधित धनदांडग्यांची अतिक्रमणे वाचवून गोरगरीब लोकांची घरे प्रशासनाकडून उध्वस्त केली गोरगरीब पारधी समाजाच्या लहान मुलांनसह महिलांना निर्दयपणे मारहाण

करण्यात आली.

पारधी समाजातील गोरगरीब महिला व लहान मुलांवरती अमानुष लाठी हल्ला करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर अधिकाऱ्यांवरती कारवाई होणार का ? अशी जनतेत जोरदार चर्चा आहे

धनदांडगे यांच्या अतिक्रमणास हातही न लावता पारधी समाजातील जमिनीत सौर ऊर्जा प्रकल्पाच्या नावाखाली जमिनी ताब्यात घेऊन आमच्या वर अन्याय केला जात आहे असा आरोप हा स्थानिकांकडून होत आहे.

त्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे या अन्यायग्रस्त पारधी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आवाज उठवणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

इंदापूर शहर व ग्रामीण भागात प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू आहे. परंतु राजकीय हस्तक्षेप-ाने, राजकीय आकसापोटी तोंड

पाहून अतिक्रमणे काढली जात असल्याची चर्चा शहर व ग्रामीण भागात जोरात सुरू आहे.

ज्यांना लोकसभेला व विधानसभेला सर्वसामान्य लोकांनी मतदान करून लोकसभा व विधिमंडळात पाठवले ते खा-सदार सुप्रिया सुळे व मंत्री दत्तात्रय भरणे या घडलेल्या प्रकारावरती काय प्रतिक्रिया देणार याकडे सर्वांच्या नजरा लागले आहेत.

ज्या पारधी समाजाची घरे जमीनदोस्त करण्यात आली त्यांचे पुनर्वसन करणार का असाही प्रश्न समोर येऊ लागला आहे. इंदापूर तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून राजकीय विरोधकांची कमतरता सामान्य जनतेला भासू लागली आहे .जनतेच्या बाजूने आवाज उठवण्यासाठी कोणताही नेता अथवा पक्ष समोर येताना दिसून येत नाही. इंदापूर तालुक्यात सर्वच पक्ष सत्ताधारी आ-हेत असे दिसू लागले आहेत. यामुळे जनतेच्या बाजूने आ-

वाज उठवणारा विरोधक आ-वाज उठवताना दिसून येत नाही.उद्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे या इंदापूर तालुक्याच्या दौऱ्यावरती येणार आहेत. त्या बाभुळगाव येथील पारधी समाजाच्या वस्तीला भेट देऊन झाले गेलेल्या प्रकाराबाबत या भटक्या समाजातील लोकांसाठी आवाज उठवणार का? त्यांचे प्रश्न लोकसभेत मांडणार का..? त्यांना पर्यायी जागेसहित हक्काची घरे मिळवून देणार का..? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आ-हेत.

इंदापूर तालुक्यात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व नुकताच भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेले प्रवीण माने हे विधानसभेचे चेहरे मानले जातात, नुकताच इंदापूर तालुक्यातील बाबुळगाव येथे पारधी समाजातील नागरिकांची घरे उध्वस्त करण्यात आली. यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यासाठी हे तिन्ही नेते प्रयत्न करणार .? अशी चर्चा सुरू आहे.

राष्ट्रवादी -भाजप सत्ताधारी तर विरोधी पक्ष आहेत कुठे.?

इंदापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना,भारतीय जनता पक्ष एकत्रित सत्तेत आहे परंतु इंदापूर तालुक्यातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष मात्र विधानसभा निवडणुकीनंतर जन-तेचे प्रश्न मांडताना कुठेही दिसून येत नाही अशी चर्चा आहे. इंदापूर तालुक्यातील मतदारांनी लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांना सर्वाधिक मतदान करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना नाकारलं होतं, परंतु खासदार सुप्रिया सुळे या इंदापुरातील अतिक्रमण मोहिम वर काय बोलणार.? आगामी काळात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका काय असणार.? पारधी समाजाला पर्यायी जागा व घर उपलब्ध करून देणार का.? या प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष असेल.

मंदिर समितीच्या गोशाळेत पोळा सण उत्साहात साजरा श्रीस अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरची यमाई तलाव येथे गोशाळा आहे. या गोशाळेत मंदिर समितीच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी बैल-गाईंची विधिवत पुजा करण्यात आली. या गोशाळेत लहान मोठी २२६ गाई व वासरे आहेत.

तसेच पोळा सणानिमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगनजोड, शिरपेच, मत्स्य जोड, गोफ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडेजोड, पदकासह लॉकेट, बोरमाळ, चंद्रहार, मोहन माळ इत्यादी व श्रावणी शुक्रवार निमित्त श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

भिवंडी माविमला वूमन ऑन विंग्सची भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत नारीशक्ती लोकसंचलित साधन केंद्र भिवंडी येथे वूमन ऑन विंग्स बोर्ड मेंबर डोर्थी, कॉनी तसेच वूमन ऑन विंग्स डायरेक्टर अनुषा सिंग, वूमन ऑन विंग्सचे कार्यक्रम व्यवस्थापक महेश कोकरे यांनी भेट दिली.यावेळी माविम जिल्हा कार्यालय ठाणे वरिष्ठ जिल्हा सम न्वयक अधिकारी संजय गर्जे, जिल्हा समन्वयक अधिकारी वर्षा पाटील समन्वयक अधिकारी वर्षा पाटील, तसेच जिल्हा प्रकल्प सल्लागार हेमंत पाटील यांनी भेट दिली. भिवंडी नारीशक्ती लोकसंचलीत साधन केंद्र व्यवस्थापक शीतल कोरेगावे, नारीशक्ती लोकसंचलित साधन

केंद्र.अध्यक्ष जुल्फिया अन्स-री, लेखापाल संजना आढाव नारीशक्ती लोकसंचलित साधन केंद्र. आणि सर्व सहयोगिनी उप-स्थित होते .कार्यक्रमाची सुरुव-ात क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आले नारीशक्ती लोकसंचलीत साधन केंद्र भिवंडी यांच्या तर्फे आलेल्या पाहुण्यांना पुष्पगुच्छ शाल तसेच वारली पेंटिंग देऊन सन्मान करण्यात आला .कार्यक्रमाच्या सुरुवातीला पीपीटी द्वारे माविम व नारीशक्ती नारीशक्ती लोकसंचलित साधन केंद्र. बदल माहिती देण्यात आली तसेच महिलाद्वारे बनवण्यात आलेल्या उत्पादनाचे प्रदर्शन करून त्यावर आलेल्या मान्यवरांसोबत चर्चा केली. त्यानंतर गारमेंट युनिट ला भेट देऊन आलेल्या पाहुण्यांचा अभिप्राय घेतला. सर्व पाहुण्यांचे कार्यकारणी व नारीशक्ती लोकसंचलित साधन केंद्र.सहयोगिनी तर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथे गणेशोत्सव शांततेत व पारंपरिक पद्धतीने साजरा करा : पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथे गणेशो त्सव व रमजान ईद सण शांततेत परंपरिक पद्धतीने साजरा करा अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री सुरेश चिल्ला ।वार. साहेब . यांनी केली . यावेळी गणेशोत्सव तसेच रमजान ईद सण असल्याने अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनच्या वतीने अक्कलकोट रेल्वे स्टेशन. येथे शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार साहेब तसेच . एपीआय अमोल माने साहेब, पोलीस हवालदार मिया वाले व पोलीस हवालदार दासरे साहेब तसेच पोलीस कॉन्स्टेबल माने साहेब, पोलीस हवालदार बहिर गोड़े तसेच पोलीस पाटील चव्हाण सर श्रीकांत पाटील, तुळजाराम कामठी, उत्तम गायकवाड तसेच अजय गायकवाड, सुतार सर पोलीस पाटील सौ सुनंदा माळी.

यावेळी उपसरपंच श्रीकांत चव्हाण, जयदेव राठोड, पिंटू पाटील, कय्युम काझी, महादेव बडडूरे, अनिल सोनकांबळे, गजानन उडचण, किरण चव्हाण, अक्षय पवार, हणमंत कापसे, नंदू माळी, बसवराज सर गिरमल दादा, तसेच महातेश पाटील, प्रकाश शहा, विजय पाटील – आदि सह गणेश उत्सव मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अक्कलकोटचे पत्रकार गणेश भालेराव यांच्या वतीने नूतन पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार साहेब यांचा सत्कार करण्यात आला.

डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा

गणेशोत्सव उत्साहात व शांततेत साजरा करावा : सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच परंपरा कायम ठेवत यंदाचा गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात तसेच डॉल्बीमुक्त वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सवाच्या निमित्ताने शांतता समि तीची बैठक रखुमाई पोलीस संकुल येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक धोत्रे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, टी वाय

मुजावर,पोलीस पाटील, रेखा घनवट, मूर्तिकार डीजेचे मालक तसेच शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सहा. पोलीस अधीक्षक श्री.डगळे म्हणाले, नागरिकांना ध्वन-ीप्रदुषणाचा त्रास होवू नये यासाठी डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा. लेजर शोचा वापर टाळावा.पर्यावरण पूरक गणेश म ूर्तीची स्थापना करावी. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाचा रहद-ारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत. महिला, वृद्ध व बालके यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपयोजना कराव्यात .गणेश विसर्जनाच्या मिरवणुकांसाठी जे मार्ग तसेच विसर्जनाची जागा निश्चित केले आहेत त्या ठिकाणी विसर्जन करावे तसेच मिरवणुकीसाठी दिलेल्या वेळेची मर्यादा पाळावी.

गणेशोत्सव साजरा करताना कुणाच्याही भावना दुखावण-ार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करु नयेत. मंडळानी स्वयंसेवक नेमावेत. तसेच सीसीटिव्ही लावावेत.जाहिरात फलक लावतांना आवश्यक परव-ानगी घ्यावी. जाहिरात फलकावरील मजकुर जातीय, धार्मिक द्वेष निम र्ण करणारे नसावेत. वर्गणीसाठी कुणावरही जबरदस्ती करु नये, विसर्जनावेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी.उत्सव साजरे करताना कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री ढगळे यांनी केले आहे.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथ-ापे म्हणाले गणेशोत्सव हा सर्वांचा आवडता सण आहे. हा सण सर्वजण जल्लोषात व उत्साहात साजरा करतात. यावर्षी देखील गणेशोत्सव साजरा करतांना कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी. गणेश मंडळांनी देखावे, आरास करतांना शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित आरास करावी.

गणेशोत्सवाबाबत गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी, सूचनांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

तसेच नगरपालिका प्रशासनाकडून गणेशोत्सवानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुगी, मोकाट जनावरे तसेच आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल असे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

यावेळी विविध गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच काही सुचना म ांडल्या.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय पिशवी काढणे, अपेंडिक्स हर्निया या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट करण्याची सतीश भाऊ सावंत यांची शासनाकडे मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगोला/प्रतिनिधी : महाराष्ट्रामध्ये शासनाच्या महात्मा ज्योतिराव फ ुले जन आरोग्य योज-नेमध्ये सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय पिशवी काढणे, अपेंडिक्स, हर्निया या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट नाहीत. या प्रम ुख शस्त्रक्रिया समाविष्ट कराव्यात. अशी मागणी सांगोला नगर परिषदेचे मा. बांधकाम समितीचे सभापती सतीश भाऊ सावंत यांनी राज्याचे आरोग्य मंत्री नामदार प्रकाश आबिडकर, आयुष्यमान भारत मि शनचे राज्याचे प्रमुख ओम प्रकाश शेटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाराष्ट्रामध्ये शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योज-नेमध्ये सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय पिशवी काढणे, अपेंडिक्स, हर्निया या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट नाहीत. या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट कराव्यात. शासकीय हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर व भूलतज्ञ नसल्यामुळे या शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्ण खाजगी रुग्णालयात जातात. या शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी रुग्णालयात गोरगरिबांना हजारो रुपये द्यावे लागतात. ज्यांच्याकडे पैसे नाहीत, अशा गोरगरीब रुग्णांना प्राण गमावावे लागतात. शासकीय हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची कमतरता भूलतज्ञांची कम तरता तसेच इतर गोष्टींची कमतरता असल्यामुळे आशा रुग्णांना खूप मोठी अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे या शस्त्रक्रिया शासनाच्या म हात्मा ज्योतिबा फुले योजना अंतर्गत समाविष्ट करण्यात याव्यात. यामुळे गरजू व गरीब रुग्णांना फायदा होईल व आर्थिक भार कमी होईल व म हाराष्ट्रातील रुग्णांना दिलासा मिळेल असेही निवेदनात नमूद केले आहे हे निवेदन बांधकाम समितीचे माजी सभापती सतीश भाऊ सावंत यांनी राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश अबिटकर , आयुष्यमान भारत मि शनचे राज्याचे प्रमुख राज्यमंत्री दर्जा ना. ओम प्रकाश शेटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे यांना देण्यात आलेले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

भिवंडीत रस्त्यावरील खड्ड्याने घेतला डॉक्टरचा बळी, स्थानिकांकडून निदर्शने

भिवंडी मनपाच्या जबाबदार अधिकाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी : आ.रईस शेख

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

भिवंडी शहरातील वंजारपट्टी नाका परिसरातील सिराज हॉस्पिटल जवळ रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यां मुळे रात्री झालेल्या अपघातात दुचाकीस्वार डॉक्टर चा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.डॉ.मोहम्मद नसीम अमीनुद्दीन अन्सारी वय ५८ असे मयत डॉक्टर चे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार डॉ.नसीम अन्सारी हे रात्री ढाब्यावर जेवण करून मध्यरात्री १२.२० वाजताच्या सुमारास त्यांच्या ॲक्टिव्हा बाईकने नागाव येथील घरी परतत होते. त्यावेळी सिराज हॉस्पिटल समोर रस्त्या वरील काँक्रिट रस्ता व डांबरी रस्ता याम ध्ये पडलेल्या भेगे मुळे तयार झालेल्या खड्ड्यां मध्ये त्यांच्या बाईकचा तोल गेला आणि ते रस्त्यावर पडले. त्याच वेळी तेथून जाणाऱ्या ट्रकच्या मागील टायर खाली आल्यामुळे ते चिरडले गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.या दुर्दैवी घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.नागरिकांनी काही वेळ रस्ता रा-खून गोंधळ केला होता.सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे,निजामपूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वास डागळे हे पोलिसांसह घटनास्थळी दाखल होत त्यांनी हस्तक्षेप करून नागरिकांना शांत करीत परिस्थिती नियंत्रणात आणली.त्यानंतर रात्री उशिरा निजामपूर पोलिस ठाण्यात ट्रक क्रमांक जी जे १५ ए टी ०५०६ वरील चालक मोहम्मद बिलाल मोहम्मद अस्लम या विरोधात गुन्हा दाखल करून ताब्यात घेण्यात आले आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर खड्डे असून त्या सोबतच काँक्रिट रस्ता व त्या लागतच डांबरी अथवा फेवरब्लॉक लाऊन बनवलेल्या रस्ता मधील गॅप हा अपघाताचे कारण ठरत असताना त्याच्या दुरुस्तीकडे पालिकेचे दुर्लक्ष होत आहे

.तर शहरातील अवजड वाहनांची वर्दळ वाहतूक पोलिसांनी तत्काळ थांबवावी अशी मागणी नागरिकां कडून केली जात आहे. दरम्यान सकाळी स्थानिक नागरिकांनी या खड्ड्यात खडी टाकून रस्ता बुजविण्याचा प्रयत्न केला आहे. या दुर्दैवी घटनेनंतर आमदार रईस शेख यांनी पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांची शिष्टमंडळासह भेट घेत या मृत्यू रस्त्यावरील खड्ड्यांमुळे झाला आहे .त्यामुळे या अपघातास महानगरपालिका प्रशासन जबाबदार असून संबंधित अधिकाऱ्यां विरोधात सदोष म नुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची म ागणी केली.यावर पोलिस उपायुक्त यांनी तक्रारदारांचा पुरवणी जबाब घेऊन गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती आमदार रईस शेख यांनी दिली आहे.

कमला भवानी साखर कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व मिल रोलर पूजन संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : सुजित तात्या बागल, रवी कोळेकर ,शशिकांत सरडे, समाधान भोंगे, शहाजी झिंजाडे, निमगाव चे माजी सरपंच रघुदादा शिंदे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना ही संचालक पांडुरंग आबा घाडगे राजाराम राजमाने दत्तात्रय माने नवनाथ जगदाळे राष्ट्रवादी युवा काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजिंक्य पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आटपाल जमादार माजी सरपंच बोरगाव श्रीराम गोगल शेव ाची सरपंच लक्ष्मण मस्के, माजी सरपंच देवीचा मळा सिद्धेश्वर सोरटे दत्तात्रय आढाव आणि केकान जळगाव वांगी राजेंद्र बेरे लक्ष्मण कोडलकर दत्तात्रय वाळूजकर भारत झिंजाडे सचिन गायकवाड आबासाहेब शिंदे शहाज आबा शिंदे अनिल पवार लक्ष्मण कुडाळकर भरत झिंजाडे उद्धवपुर के जानकारी मुलांनी चव्हाण हनुमंत धनवे मोहन गोडसे सचिन गायकवाड आबासाहेब शिंदे अँड विजय खरसडे, सुगरवाल नाना खडसरी अनिल शेळके तात्यासाहेब, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

साखर कारखान्याची जनरल मॅनेजर अरविंद चौधरी डेप्युटी जनरल मॅनेजर शिरसागर मुख्य शेती अधिकारी जगद-ाळे शेती अधिकारी पाटील शिप इंजिनिअर गायकवाड ची केमिस्ट्री जाधव ची फायनल ऑफिसर उबाळे , प्रशासकीय अधिकारी राम हरी जगताप पुरवठा अधिकारी सुजय शिंदे वर्चस ऑफिसर सय्यद सिविल इंजिनिअर कोणते त्याचप्रमाणे सर्व कर्मचारी आणि संपूर्ण कार्यक्रमाची व्यवस्थापन केले व कारखान्याची प्रशासकीय अधिकारी राम हरी जगताप यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

गोकुळष्टमी उत्सव २०२५ ची सांगता, श्री विठ्ठलास अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : गोकुळष्टमी उत्सवाची दि.२२ ऑगस्ट रोजी सांगता करण्यात आली असून, श्री विठ्ठल सभामंडप येथे गोपीगीत झाल्यानंतर उत्सवाच्या दिंडींची मंदिरामध्ये प्रदक्षिणा होऊन श्री संत नाम देव पायरी येथे अभंग झाला व वारकरी फडकरी महाराज मंडळी यांच्या सहभागाने दिंडीची नगर प्रदक्षिणा झाली.

तद्नंतर सभामंडप येथे गुलाल बुक्क्याचे भजन होऊन आरती करण्यात आली व उपस्थित मानाचे फडकरी विणेकरी व इतर महाराज मंडळींना खडीसाखर व नारळ प्रसाद देण्यात आला व उत्सवाची सांगता झाली. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख संजय कोकीळ व अतुल बक्षी, सहा. विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

तसेच श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, सुर्यकळ्यांचा हार, तुळ-शीची माळ, तांदळ्या हार, सोन्याचे पैजण जोड, नवरत्नाचा हार, नक्षी टोपाचे चक्र इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

भाजपा जिल्हा उपाध्यक्ष पदी विजय भोजे तर ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष पदी पोपट पुजारी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/प्रतिनिधी :

अब्दुल लाट चे सुपुत्र,कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी पक्षप्रतोद कोल्हापूर जिल्हा कोळी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष,भाजपा श्री.विजय जयसिंग भोजे (सर) यांची कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्व जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाली.तसेच शिरढोण ता.शिरोळ येथील सामाजिक कार्यकर्ते व कोळी महासंघाचे मराठवाडा संपर्क प्रमुख व भाजपा चे निष्ठावंत कार्यकर्ते श्री.सातगोंडा उर्फ पोपट पुजारी यांची कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्व जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.भाजपा पक्ष वाढीसाठी ज्यांनी सुरुवातीपा-सून समाजातील सर्वसामान्यांच्यासाठी कार्य केले त्यांच्यामध्ये पोपट पुजारी यांचा समावेश होतो.त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,ना.चंद्रकांत दादा पाटील, खा.धनंजय महाडिक,आ.अमल म हाडिक,आ.राहूल आवा-डे,माजी आमदार सुरेशराव हाळवणकर,माजी मंत्री प्रकाश आवाडे,महेश जाधव यांच्या म ान्यतेनुसार भाजपा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्व चे जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक - निंबाळकर यांनी निवडी जाहीर केल्या.

ॲड. रचना भालके यांना डॉक्टरेट पदवी व भारतभूषण राष्ट्रीय पुरस्कारांचा मान!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : मुंबई सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रियदर्शनी म हिला विकास मंडळाच्या अध्यक्षा व महिला आघाडी प्रमुख (प्रदेशाध्यक्ष) महाराष्ट्रीयन मराठा महासंघ ॲड. रचना भालकी यांना दुहेरी मान मिळाला आहे नुकतेच अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, (Hollywood, USA) तर्फे डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन यांच्यावतीनेPHD. in law(LLD) ही डॉक्टरेट पदवी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर नीती आयोग इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स ॲड. भालके या मुंबई हायकोर्ट, जिल्हा न्यायालय ठाणे तसेच सबबर्बन कोर्टात नामांकित वकील म्हणून कार्यरत असून. त्यांनी अनेक दिवाणी व फौजदारी प्रकरणात पक्षकारांना योग्य न्याय मिळवून दिला आहे. विशेष म्हणजे अनेक गोरगरीब व असह्य महिलांची प्रकरणी त्यांनी निस्वार्थीपणे, विनामूल्य लढवून न्याय मिळवून दिला आहे. न्यायालयीन लडकी बरोबर त्यांनी कायद्याचा अभ्यास व संशोधन करून दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले कार्य अखंड सुरू ठेवले आहे.

याशिवाय त्या महाराष्ट्र युवाशक्ती सामाजिक संघटनेच्या प्रदेश सरचिटणीस तसेच ज्ञानरचना शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापिका असून सामाजिक शैक्षणिक व महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी विशेष कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली आहे तर राष्ट्रीय स्तरावर भारत भूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.

पुरस्कार कायदेतज्ञ गौरव रत्न पुरस्कार, झाशीची राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, सामाजिक पुरस्कार अशा अनेक मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या दुहेरी मानाच्या पार्श्वभूमीवर पुणे येथे दोन भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. मराठा मेंबर्स ऑफ कॉमर्स, स्वारगेट तसेच पत्रकार भवन, पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला. व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी कार्याचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

प्रियदर्शनी महिला विकास मंडळ भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्रीय म राठा महासंघ, क्राईम महाराष्ट्र न्यूज, म हाराष्ट्र मुक्त पत्रकार महासंघ, स्वराज्य प्रबोधन संघर्ष समिती, सिरॉक इंडिया, भारतीय अर्थ सामाजिक साधन व्यवस्थापकीय समिती अधिसंस्थेने त्यांची अभिनंदन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

दरम्यान एन के टी कॉलेज ठाणे येथे देखील एक विशेष सत्कार कार्यक्रम पार पडला. त्यावेळी जेष्ठ उद्योगपती नानाजीभाई खिलिमजीभाई ठक्कर ठाणे वाला, व ढाणे पोलीस जॉईंट सीपी आशुतोष डुंबरे पोलीस आयुक्त दत्तात्रय भगवंतराव पाबळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, तसेच इंजिनियर जितेंद्र पाठक यांच्या शुभहस्ते ॲड. बालके यांच्या शाल व श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

खड्ड्यांनी विद्यार्थी, नागरिक, वाहनचालक झाले त्रस्त

सापे , वाशेरे नाक्यावर खड्ड्यांचे साम्राज्य; अपघाताचा वाढतोय धोका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील सापे, वाशेरे, आमणे मार्गे कल्याणकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. सततच्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघाता-ची शक्यता अधिक वाढली आहे. वाहनचालकांना रस्ता ओलांडताना तारेवरची कसरत करावी लागत असून, नागरिकांम ध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तर या खड्ड्यांना कायमस्वरूपी बूजविण्याची तसदी संबंधित विभाग घेत नसून नागरिकांकडून संतापची लाट उसळली आहे. या खड्ड्यांम ध्ये वाहने आदळत असल्यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे तर चालकांना,विद्यार्थ्यांना, रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या मार्गावर पडघा, सापे, वाशेरे, आमणे व बापगाव या औद्योगिक भागांत मोठ्या प्रमाणावर गोदामे असल्याने ट्रक, कंटेनर आणि जड वाहनांची सतत वर्दळ दिवस ,रात्र असते. खड्ड्यांमुळे ही वाहने बंद पडत असून, वाहतूक कोंडीचे चित्र नेहमी दिसते. परिणामी विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजला जाताना, तर रुग्णांना दवाखान्यात नेण्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याच रस्त्यावरील वाशेरे येथे ठाणे ग्रामीण पोलीसांचे मुख्यालय उभारण्यात येणार असून, शहापूर, भिवंडी, नाशिककडून कल्याणकडे जाणाऱ्या नागरिकांसाठी हा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती होणे तातडीचे आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तर सापे ते आमणे पर्यंत कल्याण कडे जाणाऱ्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम लवकर सुरू होईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> विविध ठिकाणी खड्डे बुजविण्याचे काम सुरू असून, येणाऱ्या गणेशोत्सव आधी रस्त्यावरील सर्व खड्डे बुजविण्यात येतील.
>
> **– उपअभियंता दत्तु गीते**
> **भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभाग**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्लोबल फाऊंडेशन दिल्ली पुरस्कार वितरण सोहळा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव/प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे,लातूर जिल्ह्यातील भिसे वाघोली गावचे सुपुत्र सुफी सय्यद शमशोद्दीन यांचे सामाजिक कार्य पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्लोबल फाऊंडेशन तर्फे भारत देशातील समाजसेवकांना प्रतिवर्षी दिला जाणारा भार-तरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारत भुषण सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२५ दिला गेला.

या पुरस्काराचे स्वरुप सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र असे असुन या कार्यक्रमाला चिफ गेस्ट स्टेट मिनीस्टर रामदास आठवले साहेब, खा.प्रतापराव जाधव, डॉ.म निष गवई,पद्मश्री बी आर विधाते, सुरेखा लामतुरे,रिंकन लाम्हो, इत्यादी मान्यवर उपस्थित होते,

महाराष्ट्र सदन दिल्ली येथे पुरस्कार वितरण सोहळ्याला मंचावर केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, सुप्रसिद्ध कन्नड अभिनेत्री विजयलक्ष्मी, आहेत महामंडलेश्वर डॉ. वैष्णवी जगदंबा, गिरीराजजी महाराज, विश्व सिंधी सेवा संगमच्या महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. भारती छाबडिया, पद्मश्री जितेंद्र सिंह छंटी, शक्ति महाराज, सन्माननीय अतिथी सुभाष चांडक, विश्व सिंधी सेवा संगम महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. डेटाराम मनोजा, समन्वयक डॉ. मनीष गवई, राहुल उके (राष्ट्रीय उपाध्यक्ष) तसेच राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ उपस्थित होते.

आमदार अभिजीत पाटील यांनी केली पूर परिस्थिती पाहणी

तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या समवेत आमदार पाटील यांनी नदीकाठच्या गावचा केला पाहणी दौरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पिराची कुरोली, वाडीकुरोली, शेळवे, खेडभाळवणी, कौठळी,व्होळे, खेडभोसे, देवडे, पटवर्धन कुरोली, आव्हे, पेहे, सांगवी, बादलकोट, उंबरे, करोळे, कान्हापुरी या भागांमध्ये माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे हे उपस्थित होते. प्रत्येक गावातील नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्यात यावे अशा सूचना आमदार अभिजीत पाटील यांनी दिल्या. देवडे येथील पुराच्या पाण्यामुळे घर संसार उघड्यावर पडलेल्या नागरिकांना अत्यावश्यक वस्तूंचे किट देण्यात आलं.

नदीकाठच्या पूरबाधित शेतकऱ्यांसाठी अजित दादाची राष्ट्रवादी मैदानात, पंचनाम्याची मागणी, कल्याणराव काळे करणार शासन दरबारी पाठपुरावा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : उजनी आणि वीर धरणा-तून सोडण्यात येत असणाऱ्या पाण्यामुळे भीमा नदीला पूर आल्याने पंढरपूर तालुक्यातील नदीकाठच्या गावातील शेतकऱ्यांची केळी, ऊस व इतर फळ शेती पिकाचे नुकसानाची पंचनामे करून त्यांना मदत मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांतिक सदस्य, व सहकारी शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे यांनी महसूल विभागाकडे केली आहे. असून त्याबाबत राज्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, यांच्याकडे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे काळे यांनी सांगितले आहे. यामुळे पूर्व बाधित शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

पुरानी बाधित झालेले पिराची कुरोली, वाडी कुरोली, खेड भोसे, खेड भाळवणी, होळे, देवडे, पटकरोली, शिरढोण या गावात भेटी देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानीची

पुरामुळे वादी शेतकऱ्यांची त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी: कल्याणराव काळे

पाहणी केली यावेळी कृषी राशीवरती चेअरमन गणेश पाटील, सहकार खेडमध्ये संचालक मोहन नाट्य परमेश्वर लाम आणि अरुण भुई, बिभीषण पवार, विश्वास उपासे समाधान उपासे, यशवंतराव चव्हाण पसंती चेअरमन शहाजी साळुंखे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आणि नागटिळक, उत्तम नाईक नवरे पिराजी पुर-वणीचे सरपंच तुकाराम, देवडी चे सरपंच सोमनाथ झांबरे, सरपंच संजय देवळे, बंडू पवार यांच्यासह बाधित शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात येत असणाऱ्या पाण्यामुळे भीमा नदीला पूर आलेला आहे त्यामुळे नदीकाठच्या गावात पाणी शिरल्याने शेतकऱ्यांच्या शेती पीक, व त्याचबरोबर फळबागा पाण्यात गेल्याने फार मोठी नुकसान झा-लेले त्याचबरोबर तिळाची कुरोली गावातील ही वस्ती येथील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांचा संसार उघड्यावर पडला आहे. म्हणून महसूल विभागाने नदीकाठच्या गावातील पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानीची त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी काळे यांनी सांगितले.

अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करावेत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टी, सत-तचा पाऊस तसेच उजनी धरण १००% भरल्याने तसेच वीर धरणातून भीमा व सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी सोडावे लागले त्यामुळे दोन्हीही नदीकाठच्या गावांमध्ये तसेच शेती पिकामध्ये पुराचे पाणी जाऊन झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ पासून सुरू करावेत, असे निर्देश कृषी विभाग व सर्व संबंधित यंत्रणांना

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

तसेच जिल्ह्यात अतिवृष्टी व सततच्या पावसाने अनेक लघु व मध्यम प्रकल्प भरलेले असून या प्रकल्पातूनही पाणी ओव्हर फ्लो झाल्याने शेती पिकांचे नुकसान झालेले आहे, अशा ठिकाणचेही नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत. पंचनाम्यापासून एक ही शेतकरी वंचित राहणार नाही याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

स्वेरीच्या चार विद्यार्थ्यांची 'ॲक्का चिल सिस्टम्स इंडिया प्रा.लि.' या नामांकित कंपनीत निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूरः 'ॲक्का चिल सिस्टम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एमबीए, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागांतील चार विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'ॲक्का चिल सिस्टम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या गौरी चंद्रशेखर गुळवे, प्रतिक्षा धर्मराज यादव, रणजित रवींद्र व्यवहारे व तुषार विजय जाडकर या चार विद्यार्थ्यांची निवड केली. 'ॲक्का चिल सिस्टम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी २७ वर्षे जुनी असून १९९७ साली स्थापन झाली आहे. ही कंपनी प्रामुख्याने एचव्हीएसी या क्षेत्रात कार्यरत आहे. लवकरच ही कंपनी एक हजार कोटी टर्न ओव्हरचे ध्येय गाठणार आहे. एचव्हीएसी हे एक विशेष कार्यक्षेत्र आहे, त्याचा उपयोग फार्मसी, दव-खाने, मेकॅनिकल आणि इतर बऱ्याच विभागात होतो. याम ुळे विद्यार्थ्यांना अशा विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'ॲक्का चिल सिस्टम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीत निवड झालेल्या या चारही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

श्रीरामनगर सोसायटीच्या संचालकपदी सचिन खडताळे यांची बिनविरोध निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : येथुन जवळच असलेल्या श्रीरामनगर येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सर्व संचालकांची महत्वाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी सुनिता लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात बोलविण्यात आली होती यावेळी रिक्त असलेल्या संचालकपदी सचिन विजयकांत खडताळे यांची बिनविरोध निवड करण्यात आहे सद-रची निवड होताच सर्व सम थकांनी पेढे वाढून आनंद व्यक्त केला.

श्रीरामनगर विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे संचालक विजयकांत भागाजी खडताळे हे मयत झाल्याने संस्थेतील संचालक पदाची जागा रिक्त होती सदर जागा नैमित्तिक रित्या भरण्यासाठी सहाय्यक निबंधक कार्यालयाने निवडणूक कार्यक्रम दिला होता.या विहीत मुदतीत फक्त सचिन खडताळे यांचेच एकमेव नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्याने व छाननीत ते मंजुर झाल्याने त्यांची बिनविरोध निवडीची

सभासद, ग्रामस्थ यांच्यवतीने सत्कार

घोषना करण्यात आली.यावेळी त्यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून संपतराव खताळे तर अनुमोदक म्हणून भगवान शिंदे यांनी सह्या केल्या आहेत.या बैठकीस भाऊसाहेब शिंदे, किरण जाधव, भाऊसाहेब शिंदे, संपतराव खताळे, अशोक कोंढरे, अरुण गाडेकर, भगवान शिंदे,सुदाम काळे, शोभा शिंदे, ताराबाई गोसावी सचिव शिवाजी तुगावे, नामदेव शिंदे, हे उपस्थित होते.

सभासद व ग्रामस्थ यांच्या वतीने सचिन खडताळे यांचा सत्कार

श्रीरामनगर विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या संचालक पदी युवक काँग्रेसचे तालुकाध्याक्ष सचिन खडताळे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा सभासद व ग्रामस्थ यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी यांच्यासह विनायक शिंदे, प्रभाकर हुजबंद, नंदकिशोर कापसे, सोमनाथ खताळे, स्वप्निल बिनायकिया,सतिश भालेराव, विकास खताळे, सचिन निकाळे, सुहास सुरळीकर, हर्षल जगताप, गजिराम खापरे, राहुल गायकवाड, आभिजित डांगरे,सुरेश गोसावी शिध्दार्थ वाघ, चंद्रमनी पग-रे, अलिभाई शेख, दीपक खडताळे, मनोज खडताळे, प्रवीण खडताळे, सिद्धार्थ वाघ यांच्यासह निफाड श्रीराम नगर ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.सत्कार सोहळ्याचे सुत्रसंचलन विनायक शिंदे यांनी केले तर आभार नामदेव शिंदे यांनी मानले.

निफाडचा विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी निफाड ग्रामस्थांचे महावितरणला निवेदन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड /प्रतिनिधी : निफाड शहरात व परिसरात वाढत्या चोऱ्यांचे प्रमान लक्षात घेता महावितरण कंपनीकडून सुरळीत विज पुरवठ्याची आवश्यकता आहे. अनेक दिवसापासुन विजेचा लपनडाव सुरु आहे त्यामुळे ग्राहक अक्षरशः वैतागले आहे.निफाड ग्रामस्थ कायमच महावितरण कंपनीला सहकार्य करीत आले आहे तेव्हा निफाड व परिसरातील ग्रामस्थाना सुरळीत व अखंडीत पुरवठा करावा अशा आशयाचे निवेदन ग्रामस्थांच्या वतीने उपकार्यकारी अभियंता सुनिल राऊत व शाखा अभियंता पवार यांना देण्यात आले आहे.या निवेदनावर विजय धारराव, शाम गोळे, रावसाहेब कुंदे व बापूसाहेब कापसे यांच्या सह्या आहेत

महाराष्ट्र राज्यातील सर्व कन्नड माध्यम शाळाना नली-कली, वाचनालय पुस्तके आणी शिक्षक व विद्यार्थी मार्गदर्शीका पुस्तक वितरण सोहळा संपन्न

अक्कलकोटमध्ये गडिनाडू कन्नड साहित्य-संस्कृती उत्सव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : गडिनाडूमध्ये कन्नड भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या टिकावासाठी कर्नाटका सरकारने घेतलेल्या उपक्रमांचा भाग म्हणून, अक्कलकोटमध्ये भव्य गडिनाडू कन्नड साहित्य-संस्कृती उत्सव आयोजित करण्यात आला. याच वेळी महाराष्ट्र राज्यातील सर्व कन्नड माध्यम शाळाना नली-कली साहित्य, वाचनालय पुस्तके आणी शिक्षक व विद्यार्थी मार्गदर्शीका पुस्तक वितरण करित असल्याची घोषणा कर्नाटका सीम ाभाग विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष सोमण्णा बेविनमरद यांनी केली.

अक्कलकोट येथील प्रियदर्शिनी सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला त्यांनी ज्योती प्रज्वलित करून बोलत होते. ते पुढे म्हणालेमहाराष्ट्रात असले तरी गडिनाडू कन्नडिग त्यांनी भाषा, साहित्य, संस्कृतीला जिवंत ठेवून आहेत. त्यांच्या मागण्यांना प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने हा उत्सव आयोजित केला आहे. कन्नडच्या टिकावासाठी राज्य सरकार नेहमीच वचनबद्ध आहे. महाराष्ट्रात कन्नड माध्यम शिक्षण घेणार्या सर्वाना कर्नाटकात येत असलेल्या सर्व समस्या सोडविण्यात येथ आहेत, दिलेल्या आरक्षणाचा योग्य अंबलबजावणी येथे लवकरात करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

प्राधिकरणाचे सचिव प्रकाश मत्तिहाळी यांनी सांगितले की, गडिनाडूमध्ये गेल्या ४४ वर्षांपासून असलेल्या मागणीच्या नली-कली साहित्याचे वितरण आता २२५ कन्नड शाळांना करण्यात येत आहे. कन्नड प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील सर्व कन्नड शाळांना नली-कली साहित्य वितरित करण्यात आले. निवृत्त वरिष्ठ शिक्षक एस.के. बिरादार यांनी उत्सवाचे सर्वाध्यक्ष होते. याचवेळी साहीत्यीक गिरीष जकापुरे लिखित पारीवाळ मत्तु अग्गष्टीके पुस्तक प्रकाशन करण्यात आला.

गौरव – पुरस्कार वितरण

कार्यक्रमात सोलापुर जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम केलेल्या १४ व्यक्तींना 'कन्नड कणमणी' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. * श्रीमती रत्नाबाई गुरबसप्पा घंटे – सम ाजसेविका, अक्कलकोट * श्रीमती राजश्री सिद्धराम टाके – उद्योजिका, अक्कलकोट श्री ओंकारेश्वर उटगे – समाजसेवक, चप्पलगाव *श्री लक्ष्मण हडपद – शिक्षक, घोल-सगाव * श्री अण्णप्पा होरकेरी – शिक्षक, तोळनूर * श्रीमती सुनंदा खज्जुर्गी – शिक्षिका, मैंदर्गी * श्री शरणू मनूरे – प्राध्यापक, नागणसूर * श्रीमती सुमित्रा नागरत्न – शिक्षिका, अक्कलकोट * श्री संगमेश्वर एळगाव – शिक्षक, तडवल * श्री मारुती हनुरे – शिक्षक, शिरवलवाडी * श्रीमती सुवर्णा पाटील – शिक्षिका, कर्जाळ * श्री विश्वनाथ नलगें – प्रगतिशील शेतकरी, जेवूर * श्री शांतप्पा गंगोंड – प्रगतिशील शेतकरी, नागणसूर * श्री दयानंद वरनाळे – कन्नडप्रेमी, शिरवळ

गण्यमान्यांची उपस्थिती

उद्घाटना कार्यक्रमात पूज्य बसवलिंग स्वामीजी, श्री, रेवानसिद्ध देव, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, समर्थ अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, डॉ. बी.बी. पूजारी, कसाप अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, आदर्श कन्नड बळगाचे अध्यक्ष मलिकजान शेख, महेश हिंडोळे, वीरभद्र यादवाड, कांतु धनशेट्टी, गिरीश पट्टद, सिद्धराम बाके, स्वामीनाथ हिप्परगी, किरण पाटील, शंकर अजगोंड उपस्थित होते.

विचारगोष्टी – कवीगोष्टी

दुपारच्या सत्रात शिवानंद गोगाव यांच्या अध्यक्षतेखाली शरण परंपरेवर विचारगोष्टी आयोजित करण्यात आली. उपन्यासकार म्हणून संजय पाटील आणि नीलप्पा कवटगी यांनी विषय मांडले.

याचवेळी अफजलपूरच्या साहित्यिक डी.एम. नदाफ यांच्या अध्यक्षतेखाली कवीगोष्टीचे आयोजन करण्यात आले. सिमा भागातील अनेक साहित्यीकानी सहभाग घेतला. सायंकाळी समारोप समारंभ बेंगळूरुचे प्रसिद्ध आंतराष्ट्रीय जनपद गायक गो. ना.स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली डा गुरुसिद्दय्या स्वामी यानी समारोप भाषण केले.

स्वानंद संगीत बळगचे महेश म्हेत्रे यांनी संगीत कार्यक्रम केले. बेंगळूरु, धारवाड, विजयपुर आणी सिमाभागातील विविध कला संघानी कला सादर केली. यावेळी अनेक शाळा सहभागी घेतल्या.

कार्याक्रमचे यशस्वीसाठी राजशेखर उमराणिकर, बसवराज धनशेट्टी, शरणप्पा फुलारी, चिदानंद मठपती, गौरीशंकर कोळी, डॉ. गिरीश जकामरे, विद्याधर गुरव, बसवराज गुरव, राजशेखर अमोघी, कल्याणी गंगोंडा, प्रशांत बिरादार, भीमाशंकर हुब्बळी, अशोक कोगणूर, शरणु कोळी, गुरुराज मठपती, बसवर-ाज दोड्मनी यानी परीश्रम घेतले. विद्याधर गुरव यांनी सुत्रसंचलन केले तर बसवराज धनशेट्टी यांनी आभार मानले.

कन्नडिगरांचा उत्साह

हा उत्सव अक्कलकोट आणि गडिनाडू कन्नडिगरांसाठी अभिमान आणि उत्साहाने भरलेला क्षण ठरला. कन्नडच्या टिकावासाठी सरकारने घेतलेल्या उपक्रमांना लोकांनी प्रशंसा व्यक्त केली.